कृषि व पदुम विभाग (खुद्द) मध्ये सरळसेवा, पदोन्नती व प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यासंदर्भात नियुक्ती प्राधिकारी घोषित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांकः रवका-१०१७/प्र.क्र.५८४/प्रशा-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
तारीख: ०३ जानेवारी, २०१८

वाचा :-

सा.प्र. विभाग, शासन निर्णय क्र. एसआरव्ही २०१६/प्र.क्र.२९०/कार्या.१२, दि.१९.११.२०१६

प्रस्तावना :-

सामान्य प्रशासन विभागाने त्यांच्या दिनांक १९.११.२०१६ च्या संदर्भाधीन शासन निर्णयान्वये गट-ब (अराजपत्रित), गट-क आणि गट-ड मधील पदांसाठी संबंधित विभागाचे सचिव/ विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख यांना नियुक्ती प्राधिकारी म्हणून घोषित केलेले आहे. मात्र या पदांवर सरळसेवेने, पदोन्नतीने वा प्रतिनियुक्तीने करावयाच्या नेमणूका/ पदस्थापनेच्या प्रकरणांवर अंतिम निर्णय घेण्यासाठी नियुक्ती प्राधिकारी कोण असतील यासंदर्भात संबंधित प्रशासकीय विभागांनी पदनिहाय नियुक्ती प्राधिकाऱ्यांचे पदनाम स्वतंत्र आदेशान्वये घोषित करण्याच्या सूचना उपरोक्त शासन निर्णयान्वये दिलेल्या आहेत.

शासन निर्णय-

सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १९.११.२०१६ च्या शासन निर्णयान्वये सूचित केल्यानुसार कृषि व पदुम विभागातील गट-ब (अराजपत्रित), गट-क आणि गट-ड मधील पदांसाठी नियुक्ती प्राधिकारी घोषित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

कृषि व पदुम विभाग (खुद्द) मध्ये कृषि व पदुम असे दोन प्रभाग असून या दोन्ही प्रभागांसाठी सचिवांचा स्वतंत्र पदभार आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या दि.९.३.२०११ च्या परिपत्रकास अनुसरुन, विभागाची आस्थापना ही कृषि सचिवांकडे आहे. त्यामुळे सद्य:स्थितीत शासनाने कृषि व पदुम (खुद्द) विभागात सरळसेवेने, पदोन्नतीने वा प्रतिनियुक्तीने रुजू होणाऱ्या गट-ब (अराजपत्रित), गट-क (वाहनचालक पदाच्या समावेशासह) आणि गट-ड पदांवरील कर्मचारी यांना विभागात नेमणूका/ पदस्थापना देण्याच्या प्रकरणांवर अंतिम निर्णय घेण्यासाठी अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव (कृषि -आस्थापना) यांना पदनिहाय नियुक्ती प्राधिकारी घोषित करण्याचा निर्णय घेतला आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०१०३१२३४३५४१०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sugriv Sambhaji Dhapate

Digitally signed by Sugriv Sambhaji Dhapate
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d02297f9b5e889636956e39bfae4ea112e908c0e9a7e572d4190f9709a817f51, cn=Sugriv Sambhaji Dhapate
Date: 2018.01.03 12:41:03 +05'30'

(सु. सं. धपाटे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव
२. मा. मंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव
३. मा. राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव
४. मा. राज्यमंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव
५. प्रधान सचिव (कृषि) यांचे स्वीय सहाय्यक, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२
६. सचिव (पदुम) यांचे स्वीय सहाय्यक, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२
७. सर्व सह सचिव/ उप सचिव/ अवर सचिव/ कक्ष अधिकारी, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२
८. उप सचिव (का.१२), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२
९. निवड नस्ती.